# पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-३, पिंपरी चिंचवड

पत्ता : दुसरा मजला एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणे,पी.सी.एन.टी.डी.ए. सर्कल, सेक्टरनं.०७,स्पाईन रोड, भोसरी पुणे, ४११०२६

ईमेल- dcpzone3.pcpc-mh@gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट** दिनांक ११/०१/२०२४

## ‘‘ नव्या वर्षात चाकण पोलीसांकडुन पुन्हा दमदार कारवाई’’

# सराईत मोटार सायकल चोरटा अशोक सोनवणेला शिताफीने अटक, त्याचेकडुन चोरीच्या एकुण १२ मोटार सायकली जप्त

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालया अतंर्गत चाकण पोलीस ठाणे हददीमध्ये मोठया प्रमाणात औदयगिक क्षेत्र असल्याने अज्ञात व्यक्तिंकडुन मोटारसायकल चोरी होत असल्याने मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, सह पोलीस आयुक्त, श्री. सजंय शिंदे, अपर पोलीस आयुक्त,श्री. वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३ श्री.संदिप डोईफोडे, सहा. पोलीस आयुक्त, राजेंद्रसिंह गौर यांनी मोटारसायकल चोरीबाबतचे गुन्हे उघड करण्याबाबत श्री. अशोक कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक चाकण पोलीस स्टेशन यांना सुचना दिल्या होत्या.

श्री. अशोक कदम, वरीष्ठ पोलीस निरीक्षक चाकण पोलीस स्टेशन यांनी वाहन चोरांकडुन चाकण पोलीस ठाणे हददीतील गुन्हे उघडकरण्यासाठी सपोनि प्रसंन्न जऱ्हाड व विक्रम गायकवाड तसेच अमंलदार यांना सुचना व मार्गदर्शन केले असता वरील अधिकारी व अंमलदार यांनी मोटार सायकल चोरीच्या घटनास्थळावर भेट देवुन सदर परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता सराईत रेकॉर्ड वरील मोटार सायकल चोर अशोक मधुकर सोनवणे रा. राळेगन थेरपाळ ता. पारनेर जि. अहमदनगर हा मोटार सायकल चोरीमध्ये असल्याचे निष्पंन्न झाले होते.

मोटार सायकल चोर अशोक सोनवणे याच्या एका पेक्षा जास्त बायका असुन तो पुणे, अहमदनगर, नाशिक तसेच औरंगाबाद या जिल्हयांमध्ये आपले वेगवेगळी नावे सांगुन पोलीसांपासुन आपले अस्तित्व लपवुन वेगवेगळया ठिकाणी वास्तव्य करत होता त्यामुळे त्याचे निश्चित राहण्याचे ठिकाणा बाबत माहिती मिळत नव्हती.

श्री. अशोक कदम, वरीष्ठ पोलीस निरीक्षक चाकण पोलीस स्टेशन यांनी चाकण पोलीस स्टेशन कडील सपोनि विक्रम गायकवाड, सफौ सुरेश हिंगे, पोहवा हनुमंत कांबळे, पोकॉ संदिप गंगावणे, पोकॉ महेश कोळी यांचे पथक तयार करून आरोपी अशोक सोनवणे याचा शोध सुरू केला, पथकाने आरोपी अशोक सोनवणे याचा शिक्रापुर, शिरूर, राळेगण थेरपाळ, सुपे, भाळवणी तसेच नाशिक जिल्हयातील नांदगाव तालुक्यात आरोपीचा मागमुस काढत सलत ०७ दिवस शोध घेवुन त्यास अतिषय शिताफीने ताब्यात घेतले. ताब्यात घेतल्या नतंर त्याचेकडे तपास केला असता त्याने यापुर्वी वेळोवेळी चाकण पोलीस ठाणे व इतर पोलीस ठाणे हददीतुन चोरी केलेल्या एकुण १२ मोटार सायकली काढुन दिलेल्या असुन त्या गुन्हयाचे तपासकामी जप्त करण्यात आलेल्या आहेत.

**जप्त केलेल्या एकुण १२ मोटारसायकलींचे वर्णन खालीलप्रमाणे**

| अ.क्र | जप्त वाहनाचे वर्णन | पोलीस स्टेशन गुरनं व कलम |
|---|---|---|
| ०१ | एक हिरो स्प्लेंडर मोटार सायकल नं. MH 12 JD 8825 चेसी नं. MBLHA10EZAHF02708 व इंजिन नंबर- HA10EFAHF04742 असा असलेली जु वा किं अं | चाकण पो स्टे गु र नं १२०५/२०१८ भादवि कलम ३७९ |
| ०२ | एक होन्डा शाईन मोटार सायकल नं. MH 14 FH 9081 चेसी नंबर व इंजिन नंबर खाडाखोड केलेली असलेली जु वा किं अं | चाकण पो स्टे गु र नं १०८०/२०२३ भादवि कलम ३७९ |
| ०३ | एक होंन्डा शाईन मोटार सायकल नं. MH 26 BB 4329 चेसी नंबर ME4JC651JG7432339 व इंजिन नंबर JC65E70646585 असलेली जु वा किं अं | चाकण पो स्टे गु र नं ७१८/२०२३ भादवि कलम ३७९ |
| ०४ | एक हिरो होंन्डा पॅशन प्लस मोटार सायकल नं. MH 12 FX 4595 चेसी नंबर MBLHA10ELA9C13880 व इंजिन नंबर HA10EBA9C17289 असलेली जु वा किं अं | विश्रामबाग पो स्टे गु र नं ०२/२०२४ भादवि कलम ३७९ |

| | | |
|---|---|---|
| ०५ | एक हिरो स्प्लेंडर मोटार सायकल नं. MH 14 FL 3551 चेसी नंबर MBLHA10CGGHA08250 व इंजिन नंबर HA10ERGHA18474 असलेली जु वा किं अं | चाकण पो स्टे गु र नं ११९३/२०१६ भादवि कलम ३७९ |
| ०६ | एक होंन्डा शाईन मोटार सायकल नं. MH 16 BR 7075 चेसी नंबर ME4JC651FGT277237 व इंजिन नंबर JC65ET0410901 असलेली जु वा किं अं | कोतवाली पो स्टे गु र नं ६३१/२०२१ भादवि कलम ३७९ |
| ०७ | एक हिरो स्प्लेंडर मोटार सायकल नं. MH 12 JH 9458 चेसी नंबर MLHA10ALC9E01995 व इंजिन नंबर HA10EJC9E08108 असलेली जु वा किं अं | चाकण पो स्टे गु र नं १२/२०२४ भादवि कलम ३७९ |
| ०८ | एक होंन्डा ड्रिम युगा मोटार सायकल नं. MH 12 QD 5563 चेसी नंबर ME4JC58DBJT105446 व इंजिन नंबर JC58ET6105544 असलेली जु वा किं अं | चाकण पो स्टे गु र नं १११८/२०२३ भादवि कलम ३७९ |
| ०९ | एक हिरो स्प्लेंडर मोटार सायकल नं. MH 14 T 1994 तीचा चेसी नंबर MBLHA12EMA9C016.. व इंजिन नंबर HA12E....... असलेली जु वा किं अं | चाकण पो स्टे गु र नं ४८५/२०२३ भादवि कलम ३७९ |
| १० | एक हिरो होंन्डा स्प्लेंडर मोटार सायकल नं. MH 12 KB 6035 चेसी नंबर MBLHA10ALD9E01834 व इंजिन नंबर 01K13E04609 असलेली जु वा किं अं | सदर मोटार सायकलचे डिटेल्स प्राप्त करणे चालु आहे. |
| ११ | एक हिरो स्प्लेंडर मोटार सायकल नंबर प्लेट नसलेली तीचा चेसी नंबर 03L15C21350 व इंजिन नंबर 03L15M10784 असलेली जु वा किं अं | सदर मोटार सायकलचे डिटेल्स प्राप्त करणे चालु आहे. |
| १२ | एक होंन्डा शाईन मोटार सायकल नं. MH 12 FN 1179 चेसी नंबर ME4JC366G98287947 व इंजिन नंबर JC36E94388625 असलेली जु वा किं अं | सदर मोटार सायकलचे डिटेल्स प्राप्त करणे चालु आहे. |

चाकण पोलीस स्टेशन तपास पथकातील अधिकारी व अमंलदार यांनी कौशल्यपुर्ण तपास करून अतिशय शिताफिने आरोपी नामेअशोक मधुकर सोनवणे वय ४० वर्षे, रा. राळेगन थेरपाळ ता पारनेर जि अहमदनगर यास अटक केलेली असुन त्यांचेकडुन एकुण १२ मोटारसायकल जप्त करून मोटार सायकल चोरीच्या एकुण ०९ गुन्हयांची उकल केलेली आहे. तसेच इतर ०३ वाहनांच्या इंजिन नंबर व चेसी नंबर वरून वाहन मालकांची माहिती घेवुन उकल करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त, श्री. विनयकुमार चौबे, सह पोलीस आयुक्त, श्री. सजंय शिंदे, अपर पोलीस आयुक्त,श्री. वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३ श्री.संदिप डोईफोडे, सहा. पोलीस आयुक्त, राजेंद्रसिंह गौर यांचे सुचना व मार्गदर्शना खाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अशोक कदम, पोलीस निरीक्षक गुन्हे श्री. युनुस मुलाणी तसेच सपोनि प्रसंन्न ज-हाड, सपोनि विक्रम गायकवाड, सफौ सुरेश हिंगे, पो हवा/ संदिप सोनवणे, पोहवा /राजु जाधव, पो हवा/ हनुमंत कांबळे, पोना / निखील शेटे, पोकॉ / नितीन गुंजाळ, पोकॉ /सुनिल भागवत, पोकॉ /संदिप गंगावणे, पोकॉ / अशोक दिवटे, पोकॉ /महेश कोळी, पोकॉ /विवेक सानप, पोकॉ / प्रतिक चव्हाण, मपोकॉ /माधुरी कचाटे यांनी केलेली आहे.सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ संतोष सुपेकर हे करीत आहेत.

चाकण पोलीसाकंडुन अवाहन करण्यात येते की,

१) आपण मोठया किंमतीच्या मोटार सायकली विकत घेता परंतु २/ ३ हजार रूपयांचे जीपीएस लावत नाही, आपल्या वाहनांना जीपीएस लावावे.

२)आपले वाहन सीसीटीव्ही च्या कक्षेत पार्कींग करावे.

३) वाहन रस्त्यावर कोठेही बेवासर सोडुन जास्तकाळ ठेवुन निघुन जावु नये.

४) आपले वाहनाचे गाडीला/ डिकीला चावी सोडुन जावु नये.

**(संदिप डोईफोडे )**
**पोलीस उप आयुक्त**
**परिमंडळ-३, पिंपरी चिंचवड**